## प्रेसनोट दि. १३.०९.२०२२

लोकसेवक श्री सुनिल दादासो चव्हाण, वय ४९ वर्ष, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय कडेगांव रा. अण्णाभाऊ साठे नगर, इस्लामपूर ता.वाळवा जि. सांगली यांना १०,०००/-रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी शेत जमीनीमधून जाणे येणेसाठी गाडी रस्ता मंजूर करून देण्याबाबत तहसिलदार कार्यालय कडेगांव या ठिकाणी अर्ज दाखल केला होता. त्याप्रमाणे कडेगांव तहसिलदार कार्यालयात सुनावणी सुरू होती. तसेच तक्रारदार यांचे शेतजमीनीच्या ७/१२ उताऱ्यावरील कुळकायदा कलम ४३ शर्त कमी करणेबाबत तक्रारदार यांनी तहसिलदार कार्यालय कडेगांव या ठिकाणी अर्ज केला होता. सदर दोन्ही कामामध्ये मदत करण्यासाठी श्री.चव्हाण, अव्वल कारकून यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज दि.१२.०९.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १२.०९.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री.चव्हाण, अव्वल कारकून यांनी तक्रारदार यांची वरील दोन्ही कामामध्ये मदत करण्यासाठी प्रथम १५,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१३.०९.२०२२ रोजी तहसिलदार कार्यालय कडेगांव या ठिकाणी लोकसेवक चव्हाण यांचे विरूध्द सापळा कारवाई आयोजीत केली असता सापळा कारवाई वेळी लोकसेवक चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १०,०००/- रूपये तक्रारदार यांचेकडून स्विकारले नंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. लोकसेवक श्री सुनिल दादासो चव्हाण, वय ४९ वर्ष, अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय कडेगांव रा. अण्णाभाऊ साठे नगर, इस्लामपूर ता.वाळवा जि. सांगली यांचे विरुध्द कडेगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, सिमा माने, संजय संकपाळ, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, रविंद्र धुमाळ, संजय कलकुटगी यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ★ सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.